नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 17/12/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पो. स्टे. केळवदची कार्यवाही

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर मौजा परसोडी शिवार कबीर पेट्रोल पंप जवळ येथे दिनांक 15/12/2020 चे 22.30 वा. ते 23.30 वा. दरम्यान केळवद पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन केळवद पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ वाय– 9285 क्रमांकाच्या महेन्द्र पिकअप झेनॉन गाडीला थांबवुन चेक केले असता त्यामध्ये एकुण 06 (बैल, गोऱ्हे) गोवंश कि. 60,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) विजय धीरज राउत, वय 23 वर्ष, रा. चारगाव (वाहन वाहक), 2) सचिन नथ्थुजी भलावी, वय 24 वर्ष, रा. चारगाव (वाहन वाहक) व 3) भुषन शंकरराव मिसाळ, वय 24 वर्ष, रा. सवर्णी ता. सौंसर, जि छिंदवाडा(म. प्र) यांच्या ताब्यातुन गौवंश व वाहनासह एकुण किंमती 4,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. रविन्द्र चटप, पो.स्टे. केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कळेवद येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 119 महाराष्ट्र पोलिस अधिनियम सहकलम 192(अ) मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. राठोड 8605585606 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री दिलीप ठाकुर, पोउपनि राठोड, नापोशी राजेन्द्र रेवतकर, रविन्द्र चटप, पोशी सचिन येलकर, रविन्द्र चटप व होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. मौदा :– दि. 08/12/2020 चे 05.00 वा. ते 05.30 वा. सुमारास 30 वर्षीय पिडीत/ फिर्यादी ही खापाटोली वरून नागपुरला जाण्यासाठी लिफ्ट मागत असतांना अज्ञात ट्रक चालक आरोपीने तिला लिफ्ट देउन आपल्या ट्रक मध्ये बसवुन नागपुर कडे घेऊन जात असतांना रोडवरील बोरगाव नदीचा पुल येण्याच्या एक ते दिड किमी आधी निर्जन ठिकाणी रोडवर ट्रक चालक आरोपीने आपला ट्रक थांबवुन फिर्यादीवर बळजबरीने संभोग केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नोद. सदर गुन्हाचे कागदपत्र पो.स्टे पारडी (नागपुर शहर) येथुन टपाल व्दारे प्राप्त झाल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 376 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. मोहोड 9823910156 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 14 कि.मी. मौजा मंगरूळ शिवार येथे दिनांक 03/12/2020 चे 13:00 वा. दरम्यान नागो मधुकर चांदेकर(मृतक), वय 30 वर्ष, रा. ब्राम्हणी ता. कळमेश्वर हा त्यांची एमएच–31/बीपी–5330 क्रमांकाच्या मोटरसायकलने मंगरूळ येथुन निमजी खदान येथे जात होता. त्यादरम्यान विरूध्द दिशेने 14 मैल कडुन मंगरूळ कडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाच्या चालक आरोपीने त्याचा ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्याचे मोटरसायकला समोरून धडक दिली. या अपघातात नागो चांदेकर हा गंभीर जखमी होवुन त्याचा उपचार मेडीकल कॉलेज नागपूर येथे सुरू असतांना दि. 08/12/2020 चे 23.00 वा. मरण पावला. मृतकाचे मरण्यास अज्ञात वाहनाचा चालक हा कारणीभुत असल्याने मर्ग क्र. 106/20 कलम 174 जाफौ. चे चौकशी वरुन सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा चंद्रशेखर सावध यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा. चंद्रशेखर धनराज सावध 9511653523 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर भाटपूरा हत्तीखाना चौक काटोल येथे दिनांक 25/11/2020 चे 09. 00 वा. ते 10.00 वा. दरम्यान सुरेद्र तुकाराम सहारे, वय 35 वर्ष, रा. भाटपूरा हत्तीखाना चौक काटोल हा चक्कर येवून सिमेंट रोडवर खाली पडला. त्याच्या डोक्याला मुक्का मार लागल्याने त्यास उपचारा करीता मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 14/12/2020 चे 08.30 वा. त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे, मेडीकल पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ राजेन्द्र पाली 9284354630 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर